FORM-1A

0068604

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station अ.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. 22, वर्ष Year 2023, दिनांक Date 08/06/2023

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार ........, तारीख पासून 05/06/23, वेळ 16:30 वा, तारीख पर्यंत 08/06/23, वेळ 14:57 वा.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   ✓ (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 05/06/23, वेळ Time 16:30 वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 36, तारीख Date 08/06/23, वेळ Time 22:47

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road: न्यू भूमी पार्क, फेज-2 को.ऑ.हौ. सोसा, बजीरा नगर, ऑफ मार्वे रोड, फायर ब्रिगेड जवळ, मालाड (प) मुंबई 64 आरोपीचे कार्यालय
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station मालवणी, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अजय रमणिकलाल मेहता (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रमणिकलाल मेहता
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 66, (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 9898948494
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No., फोन / मो. नं. Phone/M. No., पॅन नं. PAN No., वोटर्स नं. Card No.: बी/402, न्यू भूमी पार्क, को.ऑ.हौ. सोसा, बजीरा नगर, ऑफ मार्वे रोड, फायर ब्रिगेड जवळ, मालाड (प) मुं. 64
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   अशोक विठ्ठल बोराडे, ए-2 साई निवास, साईबाबा कॉम्प्लेक्स, गोरेगाव (पू) मुं. 63

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

फिर्यादी यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला त्यांचा जबाब हाच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल समजण्यात यावा

समक्ष

(पंकज शिंदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

जबाब

दि. ०८/०६/२०२३

श्री.अजय रमणिकलाल मेहता, हि.६८ वर्षे, धंदा— व्यवसाय, पत्ता — जी/५०१, न्यु भुमी पार्क, फेज — २ को.ऑ.हौसिंग सोसायटी, बफीरा नगर, जनकल्याण नगर, ऑफ मार्वे रोड, फायर ब्रिज, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००९५ मोबाईल क्र. ९८१९१४७५१७

———•———

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहत आहे. मी सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर असून माझी मेघना कॉन्केअर व योगी कॉन्केअर या दोन कंपन्या असून मेघना कॉन्केअरमध्ये मी स्वत: मालक असून योगी कॉन्केअर या कंपनीची मालकी माझी पत्नी नामे श्रीमती योगिनी मेहता यांचेकडे होती, परंतु सदर कंपनीचे काम मीच पाहत होतो. दरम्यान माझ्या पत्नीचे ऑगस्ट २०२२ मध्ये निधन झाले आहे. दोन्ही कंपन्याचे मार्फतीने इमारतींच्या डागडुजी व रंगरंगोटी करण्याची कंत्राटे घेत असतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

मी वर नमुदप्रमाणे राहत असलेल्या न्यु भुमी पार्क, फेज — २ को.ऑ.हौसिंग सोसायटी, बफीरा नगर, जनकल्याण नगर, ऑफ मार्वे रोड, फायर ब्रिजजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००९५ या सोसायटीचे डागडुजी व रंगरंगोटीचे रु.३५,४३,०२०/— रक्कमेचे कॉन्ट्रॅक्ट दिनांक १६/०४/२०२२ मध्ये मेघना कॉन्केअरचे नावे मला देण्यात आले. ( मेघना कॉन्केअरचे रु. २८,६९,८४९ व योगी कॉन्केअरचे ५,००,९८०/— ) एवढया रक्कमेचे डागडुजी व रंगरंगोटी करण्याचे कंत्राट मला मिळाले होते. सदरचे काम ऑगस्ट २०२२ मध्ये पुर्ण केले होते. सदर कामाचे अदयापपर्यंत मला रु. २६,७३,०२०/— इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. उर्वरीत रु. ८,७०,०००/— रक्कम (मेघना कॉन्केअरचे रु.३,६९,८४९ व योगी कॉन्केअरचे ५,००,९८०/— ) अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

मी राहत असलेल्या वर नमुद सोसायटीमधील कार्यकारीणी बरखास्त करण्यात आलेली असल्याने, सोसायटीच्या प्रशासकिय कामकाजावर नियंत्रण ठेवण्याकरीता उपनिबंधक सहकारी संस्था, पी विभाग, मुंबई कार्यालयामार्फत माहे एप्रिल २०२३ पासून श्री. अशोक बोराडे यांची प्राधिकृत अधिकारी / प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. मी केलेल्या सोसायटीच्या कामाचे उर्वरीत बील रु. ८,७०,०००/— ही रक्कम मिळणेकरीता सोसायटीचे प्रशासक म्हणून कार्यरत असलेले श्री. अशोक बोराडे यांचेकडे संपर्क साधला असता, सदरची उर्वरीत रक्कमेचे देयक मंजूरीकरीता त्यांनी माझेकडे रु.२,००,०००/— इतक्या रक्कमेची मागणी केली.

उपरोक्त नमुद लोकसेवक यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०५/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे समक्ष हजर राहून कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी मी वर नमुद केलेप्रमाणे वर्णनाचे लोकसेवक हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत व त्यावर कायदेशीर कारवाई करणेबाबत मी सही केलेली माझा स्वहस्ताक्षरातील लेखी तक्रार अर्ज व त्यासोबत केलेल्या कामाच्या देयकासंबंधी कागदपत्रांच्या छायांकीत प्रती दिल्या. सदर वेळी पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी सपोआ अविनाश पोवार यांचेशी माझी ओळख करून दिली. परंतु संध्याकाळ झाल्याने व प्रशासक बोराडे भेटू शकत नसल्याने मी घरी निघून गेलो.त्यानंतर दिनांक ०६/०६/२०२३ व ०७/०६/२०२३ रोजी माझी प्रकृती विघडल्याने मी येवू शकलो नाही. त्यानंतर दिनांक ०८/०६/२०२३ रोजी माझी प्रकृती ठिक झाल्यामुळे सकाळी १०:४५ वा.ला.प्र.वि., वरळी, मुंबई कार्यालयात आल्यानंतर पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी त्यांच्या कार्यालयात उपस्थित असलेले दोन इसमांची शासकीय पंच म्हणून ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक शिंदे यांनी मी केलेल्या अर्जाबाबत पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी केलेला तक्रार अर्ज व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती पंचांना वाचण्यास दिल्या. पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर व कागदपत्रांच्या छायांकीत प्रतीवर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज व कागदपत्रांच्या छायांकीत प्रती असे स्वत:चे ताब्यात

ठेवले. त्याचप्रमाणे मी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आज रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर मी, पोलीस निरीक्षक पंकज शिंदे, सपोआ अविनाश पोवार, एक पोलीस अंमलदार व एक शासकीय पंच असे माझे खाजगी वाहन मारुती सेलरिओ क्र.MH-02-FE-7253 ने तसेच उर्वरीत शासकीय पंच व सापळा पथक दोन शासकीय वाहनातून न्यु भुमी पार्क, फेज–२, को.ऑ. हौसिंग सोसायटी मालाड (प), मुंबई येथे रवाना झालो. सदर ठिकाणी पोहोचल्यानंतर शासकीय पंचासह सोसायटीच्या कार्यालयात गेलो असता पंच यांना इशाऱ्याने कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितल्याने त्यामुळे मी शासकीय पंच यांना सोसायटी कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. तदनंतर माझेकडे माझ्या प्रलंबित रक्कमेची देयके मंजूर करण्याकरीता रु.२,००,०००/–लाचेची मागणी इशाऱ्याने व शब्दाने केली, परंतु मी त्यांना सदर रक्कम कमी करण्यास विनंती केली परंतु त्यांनी नकार दिल्याने प्रथम हपता म्हणून रु. १,००,०००/– इतकी रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

शासकिय पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक अशोक बोराडे यांनी लाचेची रक्कम लगेच स्विकारण्याचे मान्य केल्यामुळे पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी तात्काळ सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे मला सांगीतले. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक पंकज शिंदे यांनी अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम ठेवलेले खाकी पाकीट एका गुलाबी रंगाच्या फाईलमध्ये ठेवून सदर फाईल माझेकडे देवून एका शासकीय पंचांसह मला लोकसेवक अशोक बोराडे यांच्या न्यु भुमी पार्क, फेज – २ को.ऑ.हौसिंग सोसायटीमधील कार्यालयात भेटण्याकरीता पाठविले.

सदरवेळी आमच्यापासून काही अंतर राखून पुढे मागे सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार उर्वरीत पंचासह उपस्थित होते. मी शासकीय पंचासह लोकसेवक अशोक बोराडे यांच्या सोसायटी कार्यालयात गेलो. त्यावेळी श्री. बोराडे यांनी इशाऱ्याने लाचेच्या रक्कमेची मागणी करुन रु.१,००,०००/– रक्कमेचे लाचेच्या रक्कमेचे कागदी पाकीट स्विकारले व सदरचे पाकीट त्यांनी त्यांच्या टेबलच्या बाजूला असलेल्या लाकडी बाकावरील स्वत:च्या निळया रंगाच्या सॅकबॅगमध्ये ठेवून दिले.

दिनांक ०८/०६/२०२३ रोजी अशोक बोराडे यांनी. माझे थकीत देयकाची रक्कम मंजूरीकरीता माझ्याकडे रु. २,००,०००/– रक्कमेची मागणी केली होती. मी त्यांना मागणी केलेली रक्कम कमी करण्याची विनंती केली परंतु त्यांनी नकार दिल्याने प्रथम हप्ता म्हणुन माझेंकडून रू. १,००,०००/– ची लाचेची रक्कम स्विकारणेचे मान्य केले. लोकसेवक अशोक बोराडे यांनी माझ्याकडून रु. १,००,०००/– इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. तसेच लोकसेवक अशोक बोराडे यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद मी हिंदीत सांगितली असुन तो मराठीत अनुवादीत करून मला वाचुन समजावुन सांगुन माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून, प्रिंटरद्वारे त्याची प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( पंकज शिंदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, If required) : Detail write down back blank page.

सदर फि. यांचे सिव्हील कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय असून, त्यांना न्यू भुमी पार्क फेज-२ हौ. सोसा. मधील इमारतींचे डागडुजी / रंगरंगोटी करण्याचे सिव्हील कॉन्ट्रॅक्टचे काम मिळाले होते. फि. यांनी रु. ३५,४२,०२०/- एवढ्या रकमेचे काम केले होते. सदर कामाचे फिर्यादी यांना रु. २६,५२,०२०/- एवढी रक्कम मिळाली होती. उर्वरीत रक्कम रु. ८,५०,०००/- मिळण्याकरीता फि. यांनी आरोपीशी संपर्क साधला असता, आरोपीने त्यांच्याकडे रु. २,००,०००/- एवढ्या रकमेची मागणी केली व प्रथम हप्ता रु. १,००,०००/- स्विकारण्याचे मान्य करून ते स्विकारताना आरोपीतास रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्यावर कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक पंकज शिंदे

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name .....पंकज शिंदे.....

पदनाम Rank.....पोलीस निरीक्षक.....

तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 9/06/2023.

1. Date and time of submitted to the Court.

Posting

Code No. of I. O. ..........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

प्रत मिळाली

Recd.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..............................

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..............................

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

आहिल कि. यांचे सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय असून, त्यांना न्यु म्हाडा पार्क, फेज-२
हौ. सो. मधील इमारतींचे डागडुजी / दुरुस्तीचे करण्याचे सिव्हिल कॉन्ट्रॅक्टचे
काम मिळाले होते. फि. यांनी रु. ३५,४२,०२०/- एवढ्या रकमेचे काम केले होते.
सदर कामाचे फिर्यादी यांना रु. २६,४२,०२०/- एवढी रक्कम मिळाली होती. उर्वरित रक्कम
रु. ९,००,०००/- मिळण्याकरीता फि. यांनी आरोपीशी संपर्क साधला असता, आरोपीने त्यांच्याकडे
रु. २,००,०००/- एवढ्या रकमेची मागणी केली व प्रथम हप्ता रु. १,००,०००/- स्वीकारण्याचे मान्य करून
स्विकारताना आरोपीतास रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्यावर कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा
दाखल करण्यात आला आहे.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक पंकज शिंदे

..............................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .............., जिल्हा .............., राज्य ..............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.............................................. (3) Transferred to P. S. ..............................

District.............................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ पंकज शिंदे ........
पदनाम Rank........ पोलीस निरीक्षक ........
तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 9/06/2025.
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ..............................

| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

प्रत मिळाली
अर्जक कोरडे

Recd.
[signature]

पुरवणी जबाब

दि. ०४/०७/२०२३

श्री.अजय रमणिकलाल मेहता, वि.६८ वर्षे, धंदा– व्यवसाय, पत्ता – जी/५०१, न्यु भूमी पार्क, फेज – २ को.ऑ.हौसिंग सोसायटी, बफीरा नगर, जनकल्याण नगर, ऑफ मार्वे रोड, फायर ब्रिज, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००९५ मोबाईल क्र. ९८१९९४७५१७

------•------

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहत आहे. मी सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर असून माझी मेघना कॉन्केअर व योगी कॉन्केअर या दोन कंपन्या असून मेघना कॉन्केअरमध्ये मी स्वत: मालक असून योगी कॉन्केअर या कंपनीची मालकी माझी पत्नी नामे श्रीमती योगिनी मेहता यांचेकडे होती, परंतु सदर कंपनीचे काम मीच पाहत होतो. दरम्यान माझ्या पत्नीचे ऑगस्ट २०२२ मध्ये निधन झाले आहे. दोन्ही कंपन्यांचे मार्फतीने इमारतींच्या डागडुजी व रंगरंगोटी करण्याची कंत्राटे घेत असतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

आज रोजी पो.नि. शिंदे यांनी मला दिनांक ५/०६/२०२३ रोजीचा मी प्रशासक अशोक बोराडे यांच्या विरूध्द दिलेला तक्रार अर्ज व दि. ८/०६/२०२३ रोजीची फिर्याद मला वाचण्यास दिली असता, मी वाचून पाहिली त्यातील मजकूर बरोबर व खरा असून त्याबाबत माझे अधिकचे सांगणे की, न्यू भूमी पार्क फेज २ सोसायटीवर प्रशासक अशोक बोराडे हे मार्च २०२३ मध्ये नियुक्त झाले त्यानंतर माझे थकित बीलाकरीता त्यांना भेटून बीला बाबत विचारपूस केली असता, त्यांनी सांगितले की, तुमच्या थकित बीलाबाबत मी तपासून तुम्हाला सांगतो. त्यानंतर मी सोसायटी कार्यालयात जावून अशोक बोराडे यांना भेटलो असता त्यांनी सांगितले की, सोसायटी सदस्यांची विशेष सभा झाल्यानंतर निर्णय घेवू असे सांगितले त्यानंतर दिनांक २८/०५/२०२३ रोजी सोसायटी सदस्यांची विशेष सभा झाल्यानंतर मला एकटयामध्ये अशोक बोराडे यांनी मला सोसायटी कार्यालयात बोलावून माझ्याकडे रू.२,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी केली परंतू मला सदर पैसे दयायचे नसल्याने मी दोन ते तीन वेळा बोराडे यांच्याकडे जावून मी माझ्या कामाचे बील मंजूर करण्यास सांगितले परंतू ते बील मंजूर करत नसल्याने व माझ्याकडे पैशाची मागणी करत असल्याने मी दि.५/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय मुंबई येथे येवून तक्रार अर्ज दिला आहे.

माझा वरील पुरवणी जबाब मी हिंदीत सांगितला असुन तो मराठीत अनुवादीत करून मला वाचुन समजावुन सांगुन माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून, प्रिंटरद्वारे त्याची प्रिंट काढुन तो मला वाचण्यास दिली असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( पंकज शिंदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

पुरवणी जबाब

दि. ०४/०७/२०२३

श्री.अजय रमणिकलाल मेहता, हि.६८ वर्षे, धंदा— व्यवसाय, पत्ता — जी/५०१, न्यु भुमी पार्क, फेज — २ को.ऑ.हौसिंग सोसायटी, बफीरा नगर, जनकल्याण नगर, ऑफ मार्वे रोड, फायर ब्रिज, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००९५ मोबाईल क्र. ९८१९१४७५१७

———•———

मी वर नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहत आहे. मी सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर असून माझी मेघना कॉन्केअर व योगी कॉन्केअर या दोन कंपन्या असून मेघना कॉन्केअरमध्ये मी स्वत: मालक असून योगी कॉन्केअर या कंपनीची मालकी माझी पत्नी नामे श्रीमती योगिनी मेहता यांचेकडे होती, परंतु सदर कंपनीचे काम मीच पाहत होतो. दरम्यान माझ्या पत्नीचे ऑगस्ट २०२२ मध्ये निधन झाले आहे. दोन्ही कंपन्यांचे मार्फतीने इमारतींच्या डागडुजी व रंगरंगोटी करण्याची कंत्राटे घेत असतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

आज रोजी पो.नि. शिंदे यांनी मला दिनांक ५/०६/२०२३ रोजीचा मी प्रशासक अशोक बोराडे यांच्या विरूध्द दिलेला तक्रार अर्ज व दि. ८/०६/२०२३ रोजीची फिर्याद मला वाचण्यास दिली असता, मी वाचून पाहिली त्यातील मजकूर बरोबर व खरा असून त्याबाबत माझे अधिकचे सांगणे की, न्यू भूमी पार्क फेज २ सोसायटीवर प्रशासक अशोक बोराडे हे मार्च २०२३ मध्ये नियुक्त झाले त्यानंतर माझे थकित बीलाकरीता त्यांना भेटून बीला बाबत विचारपूस केली असता, त्यांनी सांगितले की, तुमच्या थकित बीलाबाबत मी तपासून तुम्हाला सांगतो. त्यानंतर मी सोसायटी कार्यालयात जावून अशोक बोराडे यांना भेटलो असता त्यांनी सांगितले की, सोसायटी सदस्यांची विशेष सभा झाल्यानंतर निर्णय घेवू असे सांगितले त्यानंतर दिनांक २८/०५/२०२३ रोजी सोसायटी सदस्यांची विशेष सभा झाल्यानंतर मला एकटयामध्ये अशोक बोराडे यांनी मला सोसायटी कार्यालयात बोलावून माझ्याकडे रू.२,००,०००/— इतक्या रक्कमेची मागणी केली परंतू मला सदर पैसे दयायचे नसल्याने मी दोन ते तीन वेळा बोराडे यांच्याकडे जावून मी माझ्या कामाचे बील मंजूर करण्यास सांगितले परंतू ते बील मंजूर करत नसल्याने व माझ्याकडे पैशाची मागणी करत असल्याने मी दि.५/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय मुंबई येथे येवून तक्रार अर्ज दिला आहे.

माझा वरील पुरवणी जबाब मी हिंदीत सांगितला असुन तो मराठीत अनुवादीत करून मला वाचुन समजावुन सांगुन माझे सांगण्याप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून, प्रिंटरद्वारे त्याची प्रिंट काढुन तो मला वाचण्यास दिली असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( पंकज शिंदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई